Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेसनोट दि. २१/१२/२०२०

## जबरी चोरीतील फरार आरोपी त्याचे विधिसंघर्षीत बालक साथिदारासह पिपरी-चिंचवड, गुन्हे शाखा युनिट- ४ चे ताब्यात वाहन चोरीचे ०४ गुन्हे उघड

## एकुण ०१,४५,०००/- रु. किं. च्या ०४ मोटारसायकल जप्त

मा. कृष्ण प्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयातिल पाहिजे व रेकॉर्डवरिल आरोपी तपासुन परिसरात घडणारे घरफोडीचे तसेच वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन प्रतिबंध करण्याचे आदेश दिल्याने आम्ही गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व अंमलदार यांना रेकॉर्ड वरील पाहिजे आरोपी,घरफोडी तसेच वाहन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवुन गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेशित केले होते.

या अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख,पोहवा/२५० नारायण जाधव, पोना/९१६ तुषार शेटे, पोशि/४९८ शावरसिद्ध पांढरे, पोशि/१८७२ गोविंद चव्हाण, पोशि/२२९३ धनाजी शिंदे,पोशि/२२९७ तुषार काळे यांचे पथक दि.२५/०२/२०२१ रोजी हिंजवडी पोलिस स्टेशन हद्दीत गस्त घालत असतांना बातमी मिळाली की, सांगवी पोलिस स्टेशन गु.र.क्र.२९८/२०२० भा.द.वि. कलम ३९४ मधिल फरार असलेला एक सराईत गुन्हेगार हा त्याचे एका साथिदारासह भुमकर चौक येथे येणार असुन त्यांचेकडे एक चोरीची मोटारसायकल आहे. सदर बातमीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट-४ चे नमुद पथकाने भुमकर चौक येथे सापळा लावुन फरार आरोपी नामे विशाल विश्वनाथ कांबळे वय- २५ वर्षे, रा-नाना काटे यांचे कार्यालय शेजारी, काटे नगर, रहाटणी, पुणे यास त्याचा साथिदार एक विधिसंघर्षग्रस्त बालक, वय-१६ वर्षे, रा-व्दारका कॉलनी, बुद्धविहार समोर, पिंपळे सौदागर, पुणे यास चोरीच्या एका मोटारसायकलसह ताब्यात घेतले.सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याचे कडे कसोशिने तपास केला असता त्याने व त्याचा ताब्यातिल वि.सं. बालक साथिदार याचेसह मिळुन पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात वाहन चोरीचे खालील ०४ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे.

१) पिंपरी पोलीस ठाणे गु.र.नंबर-७३२/२०२० भा.दं.वि.कलम-३७९
२) वाकड पोलीस ठाणे गु.र.नंबर- ८२२/२०२० भा.दं.वि.कलम-३७९
३) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-१३८/२०२० भा.दं.वि.कलम-३७९
४) कोथरुड पोलीस ठाणे गु.र.नंबर- ४८/२०२१ भा.दं.वि.कलम-३७९

सदर आरोपीकडुन तपासादरम्यान ०१,४५,०००/- रु किं. च्या ०४ मोटारसायकल जप्त करण्यात आलेल्या आहेत.

यातिल आरोपी नामे विशाल कांबळे हा रेकॉर्डवरिल गुन्हेगार असुन त्याचेविरुद्ध यापुर्वी दंगा व तोडफोड तसेच जबरी चोरीचे ०२ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्री. प्रशांत अमृतकर सो, यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, रोहिदास आडे, अदिनाथ मिसाळ, पोना/ तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, आजिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, यांनी केली आहे.

(सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त-गुन्हे
पिंपरी चिंचवड




पिंपरी-चिंचवड पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय